# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.04.2024** **वार:बुधवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी प्रचार आज थंडावणार
2. लोकसभा निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांनी प्रचारात कोणत्याही प्रकारे सहभागी न होण्याचे पुणे जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट आदेश तर अनेक कर्मचाऱ्यांकडून नियुक्ती रद्द होण्यासाठी अर्ज दाखल
3. केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत राज्यातल्या अनेक विद्यार्थ्यांनी मिळवलं नेत्रदीपक यश
4. मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर आणि
5. महाराष्ट्राला लागून असलेल्या छत्तीसगढच्या सीमाभागात 29 नक्षली ठार

**<u>प्रचार समाप्ती</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठी प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात 17 राज्यातल्या 102 मतदारसंघांमध्ये 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. राज्यातल्या नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली-चिमूर या मतदारसंघात मतदान होणार असून इथला प्रचार आज संध्याकाळी 6 वाजता संपणार आहे. सर्वच पक्षांनी कालच्या दिवसभरात तिथं प्रचार सभा, प्रचार फेऱ्या आणि मतदार भेटींचा धडाका लावला होता. मतदानासाठी यंत्रणा सज्ज होत असून मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात पूर्वीच्या निवडणुकीत मतदानाची कमी टक्केवारी नोंदवणाऱ्या भागांकडे विशेष लक्ष पुरवण्यात येत आहे. मतदारांना प्रेरित करण्यासाठी विविध उद्योगांची मदत घेऊन 85 मतदान केंद्रं सजवण्यात आली आहेत.

**<u>संवेदनशील मतदान केंद्र-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या 68 संवेदनशील मतदान केंद्रात 295 मतदान अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि इतर युनिटसह काल भारतीय हवाई दलाच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं मूळ तळावर सुरक्षितपणे पोहोचवण्यात आलं.

**<u>प्रचार-सहभाग</u>**

लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त झालेल्या व्यक्तींनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमेत सहभागी न होण्याचे स्पष्ट आदेश पुण्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार या कर्मचाऱ्यांना कोणत्याही राजकीय कार्यक्रमामध्ये पक्षाचे सक्रिय सभासद म्हणून काम करता येत नाही. ही तरतूद लक्षात घेऊन नियुक्त झालेला कोणताही कर्मचारी प्रचार कार्यात आढळून आल्यास त्याच्याविरुद्ध थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिला आहे.

**<u>नियुक्ती</u>**

दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी नियुक्त झालेल्या पुणे जिल्ह्यातल्या कर्मचाऱ्यांपैकी अनेकांनी ही नियुक्ती रद्द करण्यासाठीचे अर्ज दिले आहेत. गेल्या दोन दिवसात 175 जणांचे अर्ज या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्वतंत्र कक्षात दाखल झाले आहेत. अनेक कर्मचाऱ्यांनी निवडणूक कामासाठीचं ठिकाण बदलून देण्याची किंवा अधिकार पदांमध्ये बदल करण्याची मागणी केली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या अर्जांवर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असं निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी स्पष्ट केलं आहे.

**यूपीएससी निकाल**

केंद्रिय लोकसेवा आयोगानं 2023 मध्ये झालेल्या नागरी सेवा परीक्षांचा अंतिम निकाल काल जाहीर केला. आदित्य श्रीवास्तव या अभियांत्रिकीची पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यानं या परीक्षेत देशात पहिला येण्याचा मान मिळवला. देशभरातून 1 हजार 16 विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले आहेत.

**युपीएससी-हिंगोली, कोल्हापूर**

या परीक्षेत राज्यातल्या अनेक विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवलं आहे. हिंगोली जिल्ह्यातल्या शिवनी इथला डॉक्टर अंकेत जाधव हा पहिल्याच प्रयत्नात ही परीक्षा उत्तीर्ण झाला. वैद्यकीय सेवा बजावत अभ्यास करून यश मिळवणाऱ्या अंकेत याचे वडील शेतकरी आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातल्या उत्तुरच्या वृषाली कांबळे, साळशी गावचे आशिष पाटील आणि कोल्हापुर शहरातल्या फरहान इरफान जमादार यांनीही या परीक्षेत बाजी मारली आहे. वृषाली कांबळे ही विद्यार्थिनीही पहिल्याच प्रयत्नात ही परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या अहेरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अभिजित पाखरे यांनीही या परीक्षेत यश मिळवलं आहे.

**लता मंगेशकर पुरस्कार**

लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. तर मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार संगीतकार ए. आर. रहमान यांना जाहीर करण्यात आला आहे. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी काल मुंबईत प्रभुकुंज निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत पुरस्कारांची घोषणा केली. यावेळी मंगेशकर कुटुंबीय उपस्थित होते. मोहन वाघ पुरस्कार गालिब या नाटकाला देण्यात येणार असून, समाजसेवेसाठीचा आनंदमयी पुरस्कार दीपस्तंभ फाऊंडेशनच्या मनोबल या संस्थेला देण्यात येणार आहे. तसंच संगीत सेवेसाठी रुपकुमार राठोड, पत्रकारितेसाठी भाऊ तोरसेकर, नाट्य सेवेसाठी अतुल परचुरे आणि उत्कृष्ट चित्रपट निर्मितीसाठी रणदीप हुडा यांना गौरवण्यात येणार आहे. लेखिका मंजिरी फडके तसंच अशोक सराफ आणि पद्मिनी कोल्हापुरे यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कार प्रदान सोहोळा मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या 82 व्या स्मृतिदिनी येत्या 24 एप्रिल रोजी होणार आहे.

**रामनवमी**

देशभरात आज रामनवमीचा उत्साह आहे. अयोध्येतल्या भव्य राममंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर पहिल्यांदाच साजऱ्या होणाऱ्या रामनवमीसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. अयोध्येत चोख सुरक्षा व्यवस्था तैनात असून ठिकठिकाणी तात्पुरती आरोग्य केंद्रं, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. राज्यातही विविध राममंदिरांमध्ये फुलांची, दिव्यांच्या रोषणाईची सजावट करण्यात आली आहे. तसंच आज दिवसभर धार्मिक, सांगितिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**पहिला पदवीप्रदान-जळगाव**

वैद्यकीय सेवा देताना रुग्णाना पहिले औषध हे दयाळूपणाचे द्या, असा सल्ला राज्यपाल रमेश बैस यांनी काल जळगावमधल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांच्या पहिल्या तुकडीला दूरस्थ पद्धतीने संबोधित करताना दिला. ह्या विद्यार्थ्यांनी आपला आंतरवासिता कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल राज्यपालांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. रुग्णसेवा ही देशसेवा आहे आणि या देशसेवेला आपण समर्पित झालं पाहिजे असं मत महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉक्टर माधुरी कानिटकर यांनी व्यक्त केलं.

**मतदान आवाहन-कपिलदेव**

ज्येष्ठ क्रिकेटपटू कपिल देव यांनी काल पुण्यात एका खासगी कार्यक्रमात नागरिकांना शंभर टक्के मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले....

**भाजपा यादी**

भारतीय जनता पार्टीनं लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची बारावी यादी जाहीर केली. सातारा मतदारसंघासाठी छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

**उमेदवारी अर्ज**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी काल राज्यात विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. कोल्हापूर मतदारसंघात काँग्रेसच्या शाहू महाराज छत्रपती आणि बसपाच्या संदीप शिंदे यांनी उमेदवारी अर्ज भरला. तर हातकणंगले मतदारसंघासाठी शिवसेना ठाकरे गटाचे सत्यजित पाटील सरुडकर आणि बसपाचे रविंद्र कांबळे यांच्यासह तीन अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरला.

सोलापूर मतदारसंघात भाजपाचे राम सातपुते यांनी, माढा लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील यांनी तसंच भाजपाचे रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. या मतदारसंघात विजयसिंह मोहिते पाटील यांनी पूरक म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सातारा मतदारसंघासाठी काल पाच अपक्ष उमेदवारांसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या दादासो ओव्हाळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघात विद्यमान खासदार आणि शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांनी, उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे ओमप्रकाश राजे निंबाळकर तसंच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अर्चना पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. लातूर लोकसभा मतदारसंघासाठी भाजपाचे सुधाकर शृंगारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघात आतापर्यंत 6 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**नक्षली-ठार**

महाराष्ट्राला लागून असलेल्या छत्तीसगढच्या सीमाभागात सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात काल झालेल्या चकमकीत 29 नक्षलवादी ठार झाले. छोटे बेठिया पोलीस ठाणे क्षेत्रांत नक्षली हालचालींची गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी ही कारवाई केली. सीमासुरक्षा दल आणि कांकेर जिल्हा राखीव दलाचे जवान कारवाईसाठी जात असताना या ताफ्यावर नक्षल्यांनी हल्ला केला. प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात नक्षली ठार झाले. या चकमकीत शंकर राव आणि ललीता मडावी हे दोन नक्षली ठार झाले असून त्यांची माहिती देणाऱ्याला प्रत्येकी 25 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं. गृहमंत्रालयानं या यशाबद्दल सुरक्षा दलाचं अभिनंदन केलं आहे. नक्षलवाद हा देशाची शांतता, विकास आणि युवकांचं उज्ज्वल भविष्याचा शत्रू असल्याचं मंत्रालयानं ट्विटर संदेशात म्हटलं आहे.

**हवामान**

राज्यात उन्हाचा कडाका कायम असून सर्वाधिक कमाल तापमान मालेगाव इथं 42 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उत्तर कोकणात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून विदर्भातही हवामान उष्ण आणि कोरडं राहील. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या हलक्या सरी बरसण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.